महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ५६

# सयाजीरावांचा सामाजिक, सांस्कृतिक धार्मिक सुसंवाद

बाबा भांड



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ५६

# सयाजीरावांचा सामाजिक, सांस्कृतिक धार्मिक सुसंवाद

बाबा भांड

सयाजीरावांचा सामाजिक,
सांस्कृतिक धार्मिक सुसंवाद
इतिहास
बाबा भांड
●
प्रकाशन क्रमांक - ७६
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : बाबा भांड (सचिव)
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : २४ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/
  101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/
  1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे ‘बौद्धिक नेतृत्व’च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे ‘महानायक’ सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा ‘उदोउदो’ करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील ‘विसंवाद’ कमी करून ‘सुसंवाद’ वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास ‘जोडून’ वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**



# सयाजीरावांचा सामाजिक, सांस्कृतिक धार्मिक सुसंवाद

आज जात-पात आणि धर्माच्या नावाने सगळं सामाजिक जीवन अस्थिरतेच्या काळ्याभोर ढगांनी आक्रमिले असून जनसामान्यांना पुढं काय होणार या भीतीने ग्रासले आहे. यात ठरावीक वर्षांनी अवर्षणातून येणारा दुष्काळ, यातून भरडला जाणारा शेतकरी वर्ग, लोकशाहीचे आम्हीच रक्षणकर्ते आहोत. हे टाहो फोडून सांगणारा प्रत्येक पक्ष आणि मला काय त्यात एवढ्या अनास्थेने सगळे समाजजीवन व्यापून टाकलं आहे. यातून सामाजिक, सांस्कृतिक आणि धर्मविषक सुसंवादाचा सूरच बिघडत चालला आहे, हे आहे आजचे सगळं समान वास्तव. अनास्थेची लाट दुष्काळ, प्लेग, अतिवृष्टी या संकटाहून अधिक भयावह आहे. स्वत: पलीकडेही बघणं होत न गेल्याने सर्वच स्वार्थाची वारुळे जागोजागी उभी राहिली आहेत. हे आजच्या वर्तमानाचे चित्र कमी-अधिक प्रमाणात दिसत असताना, स्वातंत्र्यपूर्ण काळात महाराज सयाजीराव गायकवाड या दूरदृष्टी राजाने जनकल्याणाचा आयुष्यभर ध्यास घेत

सामाजिक, सांस्कृतिक आणि धर्म या विषयात केलेल्या कामांचे वेगळेपण तपासणे, हा आजच्या वर्तमानावर उत्तर शोधण्याचा अल्पसा प्रयत्न या टिपणात मी करत आहे. एकेकाळी जगात बलाढ्य साम्राज्याचे मालक आणि सुधारलेले राष्ट्र टेंभा डौलाने मिरविणाऱ्या ब्रिटिशांना आपल्या सुधारणांमुळे लाजेने मान खाली करावयास लावणारे एकच एक सयाजीराव गायकवाड हे आधुनिक भारताचे शिल्पकार होऊन गेले. सत्तर वर्षे हा इतिहास काहींना काही कारणाने अभ्यासक, संशोधक आणि लेखकांकडून पुनर्वाचन करणे राहून गेलाय. ते अल्पसे काम आपण करत आहोत.

## चौसष्ट वर्षांची सुखावह कारकीर्द :

महाराजा सयाजीरावांनी चौसष्ट वर्षांची कारकीर्द ही आधुनिक भारताच्या सुप्रशासनाची अनेक क्षेत्रांतील पायाभरणीच होती. राजा बनल्यावर स्वत: शिकून, शिक्षण हेच परिवर्तनाचे एकमेव साधन आहे, हे त्यांनी ओळखले. मूळत: हुशार, नवे शिकण्याची त्यांची चिकाटी यातून त्यांचा ज्ञानाचा तिसरा डोळाच उघडला गेला. सहा वर्षांच्या प्रशासन व व्यवहार शिक्षणाच्या अध्ययनातून त्यांनी जाणले, राजाला अधिकार आणि सत्तेतून जनतेसाठी कल्याणकारी गोष्टी करता येतील. त्यांच्या देशीय आणि परदेशीय गुरुवर्यांनी किशोरवयीन राजाच्या मनावर पक्के बिंबविले की, शिक्षण हाच प्रगती आणि परिर्वनाचा एकमेव मार्ग आहे. ते प्रजेला उत्तम प्रकारे देणे हे राजाचे कर्तव्य आहे.

सयाजीरावासारख्या जिज्ञासू आणि प्रजाहिताचे स्वप्न पाहणाऱ्या तरुण राजाने शिकत असताना हिंदुस्थान आणि जगाच्या इतिहासाची तोंडओळख करून घेतली. जगावर राज्य करणाऱ्या इंग्रज सरकारची ताकद शिक्षण अन् प्रशासन कौशल्यातच आहे, हे त्यांनी ओळखले. अठराव्या वर्षी प्रत्यक्ष राज्यकारभार हाती येताच राज्यभर फिरून त्यांनी भूप्रदेश अन् रयतेची ओळख, त्यांचे प्रश्न समजून घेतले. पावसावर अवलंबून असलेली बेभरवशाची शेती आणि शिक्षणाचा सर्वत्र अभाव हे समोर आले. रयतेची ही अवस्था बघून त्यांनी एक वर्षात जंगलात अन् गावकुसाबाहेर राहणाऱ्या वंचित अन् अस्पृश्य प्रजेसाठी सरकारी खर्चाने शिक्षण, निवास व्यवस्था अन् पाटी-पुस्तके देण्याचा समाजक्रांतीचा हुकूम काढला. सामाजिक सुधारणाची ही भक्कम पायाभरणीची सुरुवात होती.

## विलायत प्रवासाने ज्ञानभांडाराचा खजिना हाती आला :

राज्यकारभार हाती येण्याअगोदर महाराजांचा प्रथम विवाह १० जानेवारी १८८० साली तंजावरच्या लक्ष्मीबाई मोहितेशी झाला. गृहसौख्य आणि राजकारभार एकाच वर्षी सुरू झाले. या दोन्ही आघाड्यांवर त्यांनी आनंद आणि उत्साहाने काम सुरू केले; पण त्यांच्या संसार सुखाला चारेक वर्षात दृष्ट लागली. पत्नी महाराणी चिमणाबाईंचे अल्पशा आजाराने ७ मे १८८५ ला दु:खद निधन झाले. राजगादीचा वारस बालक राजपुत्र फत्तेसिंग अन् सयाजीरावांवर दु:खाचा डोंगर कोसळला. यातून त्यांना

संमती दिली. देवासच्या घाडगे सरदार घराण्यातील गजराबाईंशी २८ डिसेंबर १८८५ ला विवाह होऊन चिमणाबाई दुसऱ्या महाराणी बनल्या; पण निद्रानाशाच्या त्रास कमी होईना. प्रकृती उपचारासाठी विलायतेत जावे, असे तज्ज्ञ डॉक्टरांनी सुचविले आणि १८८७ मध्ये महाराजा सयाजीराव यांचा पहिला विलायत प्रवास घडला.

अर्ध्या जगावर साम्राज्य पसरलेल्या ब्रिटिश सत्तेच्या प्रशासन अन् सामर्थ्याचे रहस्य कशात आहे, हे शोधण्याची सयाजीरावांची जिज्ञाचा उफाळून आली. या परदेश प्रवासात त्यांनी प्रकृती स्वास्थ्याच्या उपचारासोबत लंडनमधील शिक्षण संस्था, कार्यालये, उद्योगधंदे, ग्रंथालये, वस्तुसंग्रहालये पाहिले. प्रत्येक गोष्टींची डायरीत नोंद ते करू लागले. त्या विषयातील व्यक्तींशी चर्चा करू लागले. सार्वभौम सत्तेच्या सामर्थ्याचे एक एक पैलू त्यांच्या समोर उलगडत गेले आणि त्यांनी मनाशी ठाम निश्चय केला. जे जे नावीन्यपूर्ण, जनतेच्या हिताचे अन् उपयोगाचे आहे, ते ते बडोद्यासाठी घेऊन जायचे.

## शिक्षण हेच परिवर्तन सुधारणा साधन :

अक्षरओळख अन् अंकज्ञानाच्या शिक्षणाने सुरुवात केलेल्या सयाजीरावांनी अस्पृश्य-वंचितांच्या शिक्षणाने राजकर्तव्य आणि समाजक्रांतीची सुरुवात केली, हे आपण पाहिले. त्यावेळी बडोदा राज्यात शंभराहून कमी शाळा होत्या. पुढे सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण सुरू करून त्यांच्या कालखंडात जवळपास साडेतीन

हजार शाळा झाल्यात. या सोबत प्रत्येक गावात वाचनालये, संगीत शाळा, संस्कृत पाठशाळा, ट्रेनिंग कॉलेज असा शिक्षण विस्ताराचा पाया भक्कम होत गेला. प्रजेचे आरोग्य सांभाळणे हे राजकर्तव्य समजून प्रमुख शहरात दवाखाने आणि छोट्या गावात फिरते दवाखाने सुरू केले. महसूल सर्वेक्षणाने योग्य शेतसारा आकारला. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून प्रशानाचे विकेंद्रीय केले. स्वातंत्र्यपूर्व लोकशाही प्रशासनाची ही सुरुवात होती. या जनकल्याणाच्या ध्यासातून एक एक लोककल्याणाची कामे होत गेली. प्रशासनातील कार्यक्षमता वाढवून शेती उद्योगास मदत करणारे उपक्रम वाढविले. कला आणि उद्योग ही राष्ट्राची संपत्ती आहे, त्यास प्रोत्साहन आणि मदत करणे आपले कर्तव्य आहे. या जबाबदारीने कलावंत-उद्योगपतींचे जमशेटजी टाटा, दादाभाई नौरोजी, म.गांधी, म.फुले, लोकमान्य टिळक, पंडित मालवीय, लाला लजपत रॉय, श्यामजी कृष्ण वर्मा, दादाभाई फाळके, रवी वर्मा, बालगंधर्व, डॉ. आंबेडकर हे युगपुरुष; कलावंत साहित्यिक मंडळाचे ते पाठीराखे झाले.

## सयाजीरावांचा कालखंड सामाजिक सुधारणांचा कालखंड :

महाराजा सयाजीरा गायकवाड यांच्या चौसष्ट वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडाकडे बघितले तर तत्कालिन हिंदुस्थानातील सुमारे पाऊण-शतकाचा सर्वांगीण सुधारणांचा देदीप्यमान कालखंडच समोर उभा ठाकतो. यात त्यांचे प्रजाजनाचे हित व कल्याण हीच

एक कर्तव्यभावना दिसून येते. यासच ते 'तो माझा मोक्ष आहे' असे द्रष्टेपणाने म्हणत. समाजात धर्माचे महत्त्व आहे. धर्माच्या संबंधाने समाजात अनेक रूढी - परंपरा वर्षानुवर्षे पाळल्या जातात. या धर्माची ओळख स्वत:स व्हावी या शिक्षण जिज्ञासेपोटी त्यांनी प्रमुख धर्माची मूलतत्त्वे तज्ज्ञांकडून समजावून घेतली. हिंदू धर्मातील चार वेदांचे सार संस्कृत पंडितांच्या मदतीने माहीत करून घेतले. या अभ्यासातून त्यांच्या लक्षात आले, सर्व धर्मांची मूलतत्त्वे मानवी कल्याणाचा विचार करणार आहेत, पण समाजात रूढी-परंपरा, विधीच्या कर्मकांडातून अनेक वाईट गोष्टींचा यात शिरकाव होत गेला. यातून जनसामान्यांच्या फसवणुकीचे प्रकार वाढत गेले. यावर उपाय म्हणजे शिक्षणाच्या मदतीने सामाजिक व धार्मिक सुधारणांची डोळसपणे सांगड घालणे होय.

त्याकाळात बऱ्याच मोठ्या प्रमाणात बालविवाह प्रचलित होते. बालवयात लग्न केल्याने मुलांचे शिक्षण, संसाराची जबाबदारी या गोष्टी दूर जात. इ.स. १९०४ साली यावर बालविवाह प्रतिबंधक कायदा करून मुलांचे १६ वर्षे मुलीचे १२ वर्षे वयाचे बंधन घातले. कायदा मोडणारास शंभर रुपये दंड सुरू केला. त्याकाळात स्त्रियांसाठी गोषाबंदी पाळली जाई. महाराणी चिमणाबाई यांनी स्वत: गोषापद्धतीचा त्याग केला. पुढे गोषाबंदीचा कायदा केला. अकाली पती निधनानंतर आयुष्यभर विधवा म्हणून आयुष्य काढणाऱ्या स्त्री जातीसाठी विधवा विवाहास मान्यता देणारा कायदा केला. यासोबत घटस्फोटांचा

कायदा, मालमत्तेत पत्नी-मुलींचा वाटा हे कायदे केले. विधवा विवाहासाठी खर्चास सरकारकडून मदत दिली जाई.

समाजाने किंवा मुख्य प्रशासनाने समाजविघातक परंपरा चालू द्याव्यात की बंद कराव्यात याबद्दल सयाजीरावांनी हिमतीने आणि जबाबदारीने एक एक निर्णय घेतले. हे करताना राजनीतिशास्त्रीसंबंधी त्यांची भूमिका स्पष्टच दिसून येते. या सामाजिक सुधारणा अनेक समकालीन उच्चवर्णीय सुधारक अन् राष्ट्रीय चळवळ करणाऱ्या युगपुरुषांना आवडल्या नाहीत. काहींनी महाराजांच्या या सुधारणासंबंधी टीकाही केली. ही विषारी प्रतिकूल टीका सहन करून त्यांनी धाडसाने अनेक अवघड प्रश्न कुशलतेने सोडविले. प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणाने त्यांना वेळोवेळी परदेश प्रवास करावा लागला. या डोळस प्रवासाभ्यातून ते सामाजिक सुधारणांकडे जबाबदारीने पाहू लागले. त्या सुधारणा घाईने न करता, टप्प्याटप्प्याने एक एक सुधारणा आणि कायदे करत गेले.

कवळाणे गावातून बडोदे राजगादीवर आलेल्या सयाजीरावांनी ग्रामव्यवस्थेतील सर्व जाती-धर्मातील सलोखा अनुभवला होता. बालपणात सर्व जातींच्या मित्रांसोबत खेळणे, पोहणे, गुरे चारणे हा समानतेचा अनुभव गाठीशी होता. इ.स. १८७७ साली ते रेल्वेने दिल्लीला निघाले होते. रस्त्यात अहमदाबादेत रेल्वे थांबली. रेल्वे उपाहारगृहात सगळे भोजनासाठी उतरले. उपाहारगृहात इंग्रज लोकांसाठी, भारतीय उच्चवर्णीयासाठी

अन् कनिष्ठ वर्गासाठी वेगवेगळी भोजन व्यवस्था होती. चौदा वर्षांच्या सयाजीरावांनी कनिष्ठ वर्गाच्या उपाहारगृहात भोजन घेतले. जातीपातींचा पंगतिभेद मोडून सामाजिक सुधारणांची स्वत:पासून सुरुवात केली. यावर पुढे एक भाषणात म्हणाले, ''आपली जातिव्यवस्था ही राक्षसी प्रकारची आहे.'' अशा राक्षसी परंपरा मोडीत काढून त्यांनी पुढे बडोद्यात जातपात पाळू नये असा कायदा केला. ही गोष्ट त्यांच्या सामाजिक सुधारणातील स्वातंत्र्यपूर्व काळातील सर्वोच्च शिखरच होते. याबद्दल यरवडा तुरुंगात असलेल्या महात्मा गांधींनी सयाजीरावांना पत्र लिहून कळविले, ''हिंदुस्थानात अस्पृश्य जातींना कायद्याने शिक्षण सवलती देणारे आणि कायद्याने अस्पृश्यता दूर करणारे आपणच पहिले आहात.''

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना चारदा शिष्यवृत्ती देऊन अस्पृश्य-वंचित समाजातील एक युगपुरुष निर्माण झाल्याने बघून महाराजांना खूप समाधान वाटले. डॉ. बाबासाहेबांनी लिहून ठेवले आहे, ''महाराजांनी सामाजिक सुधारणांविषयी जे कायदे केले ते युरोप व अमेरिकेतील कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्रांच्या तद्विषयक कायद्यापेक्षा पुढारलेले आहेत.'' एखाद्या व्यक्तीने धर्मांतर केले, अथवा एखादी व्यक्ती धर्मातून बहिष्कृत केली असल्यास त्या व्यक्तीचा वारसा हक्क, मालमत्तेचा हक्क डावलला जाऊ नये, असा कायदा करून वडिलोपार्जित हक्क मुलांना दिला गेला.

## धर्मसुधारणांसाठी कायद्याची सांगड :

आपण जेव्हा सुधारणांचा विचार करतो, त्यावेळी शिक्षण, प्रशासन आणि सामाजिक सुधारणा संबंधानेच बरेचदा बोलले जाते. मात्र महाराजा सयाजीरावांनी धर्मसुधारणांसंबंधी घेतलेले निर्णय हे तत्कालीन काळातील साहसी आणि दूरदृष्टीचे होते. सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास केलेल्या या राजाने ओळखले होती की, सर्व धर्मांची मूळतत्त्वे चांगली आहेत; पण धर्माच्या पांघरुणाखाली कर्मकांडातून होणारे धार्मिक स्तोम सर्वसामान्यांची व एक प्रकारची फसवणूक आहे. प्रत्येक माणसाच्या जीवनात धर्मासंबंधीची श्रद्धा, आदर असावा, आपापल्या ईश्वराची प्रार्थना करण्याचा सगळ्यांना अधिकार आहे; पण यात कोणा मध्यस्थांची गरज नाही. त्यांनी ओळखले, कुळाचार पाळणे हा जनतेचा अधिकार असला तरी, पूजाअर्चाचा अधिकार अमुक माणसांकडे किंवा जातीकडे असावा, याबद्दल वेदात उल्लेख नाही. हे सयाजीरावांना धर्म अभ्यासातून लक्षात आल्याने त्यांनी हिमतीने एक निर्णय घेतला. शिक्षण विभागाचा भाग म्हणून धर्मखाते सुरू केले. हिंदू कायदा कोणत्याही सत्ताधीशाने बनविलेला नसला तरी, तो ईश्वरनिर्मित आहे, अशी अनेक वर्षांची परंपरा आहे. आधुनिक काळाशी सुसंगत धर्म सुधारणा करणे हे राजाचे कर्तव्य आणि अधिकार आहे या ठाम भूमिकेत धर्मविषयक कायद्यांची महाराजांनी पुढीलप्रमाणे

सांगड घालायला सुरुवात केली. जे धाडस ब्रिटिश मुलाखात ब्रिटिश सत्ताधिकाऱ्यांनी केले नाही ते महाराजांनी बडोद्यात धर्मखात्याच्या माध्यमातून सुरू केले.

धर्मखात्याच्या प्रमुखासाठी धर्माधिकारी हे पद निर्माण केले. ख्रिश्चन, जैन, इस्लाम, बौद्ध आणि हिंदू धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी त्या त्या धर्माच्या अभ्यासकांची पाटण सुरुवात केली. पूजाअर्चा करणाऱ्यास पुरोहित म्हणत. या पुरोहितांना धर्माच्या विविध विधी करताना पुरेसे ज्ञान आहे की नाही ते पाहणे-तपासणे राजसत्तेचा अधिकार असल्याने पुरोहित कायदा केला. पुरोहिताच्या ज्ञानाची किमान इयत्तेची अट घातली. या कायद्याद्वारे प्रत्येक पुरोहिताची परीक्षा घेतली जाऊ लागली. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्यास अधिकृत लायसन्स दिले जाई. असे प्रमाणात नसलेल्यास पुरोहितांना पूजाअर्चा अन् कोणताही विधी करण्याचा अधिकार नव्हता. अप्रशिक्षित पुरोहितांना व्यवसाय न करण्याचा आदेश देण्याच्या अधिकार दिवाणी कोर्टास देण्यात आले. या कायद्यात एक उपकलम होते. पुरोहिताने यजमानास त्यांच्या मातृभाषेत पूजेचा अर्थ समजावून सांगणे बंधनकारक केले. महाराजांच्या या निर्णयामुळे वर्षानुवर्षे पुरोहित व्यवसाय करणाऱ्या मंडळीत असमाधान आणि विरोधाची लाट उठली; पण यावर महाराजांनी ठामपणे सांगितले, ‘धर्मशिक्षणाची अन् त्या विषयाच्या सुधारणांची ही सुरुवात आहे. या नीती शिक्षणाने माणसाच्या स्वार्थीपणास थारा मिळणार नाही.’’

त्याकाळात कोल्हापूरचे वेदोक्त प्रकरण सुरू होते. याच्या अगोदर सयाजीराव महाराजांनी त्यांच्या राजपुत्रांचे वेदोक्त धर्मानुसार मुंजी करवून, हा वाद सामंजस्याने मिटविला. राजवाड्यात वारंवार पंगती उठत. त्यात ब्राह्मणांची सोवळ्यातील एक पंगत, कनिष्ठ वर्गासाठीची दुसरी पंगत होती. शेवटची चौथी पंगत कनिष्ठ वर्गातील लोकांची असायची. महाराजांनी हुशारीने केवळ शाकाहारी व मांसाहारी अशा दोनच पंगती ठेवून प्रश्न सोडविला. दानधर्म म्हणून बडोद्यात ब्राह्मण व मुसलमानांना वर्षभरात लाखो रुपयांची खिचडी वाटप केली जाई. ती महाराजांनी बंद केली. फक्त अपंग, गरीब, निराधार, पोरकी मुलं यांना खिचडी दिली जाऊ लागली. बचत झालेली यातील रक्कम दुष्काळ निवारण्यासाठी वळविली. शेतकी उपयोगी जनावर विक्री बंद केली. ग्रहणाची रजाबंदी, परदेश गमनाचे प्रायश्चित्तही बंद केले. संन्यास घेताना बालवयात ते होऊ नये आणि पत्नी किंवा पतीची संमती असावी, असा कायदा केला.

देवस्थानांच्या उत्पन्नाचा अनैतिक विनियोग होऊ नये म्हणून देवस्थान नियंत्रणाचा कायदा अमलात आणला. संन्यासातून ऐदी भिकारी वाढतात. ते निरुपयोगी बनून नाना प्रकरच्या व्यसनास बळी पडतात. असे धंदेवाईक भिकारी वाढून लोकं कंगाल होतात, यावर बंधने घालून शिक्षणाच्या माध्यमातून मार्ग शोधण्याचा प्रयत्न सुरूच ठेवला.

सयाजीराव महाराजांचा धर्माबद्दल आदर होता; पण धर्मात जेव्हा तत्त्वाज्ञानापेक्षा रूढी अन् परंपराच्या जागी अंधश्रद्धांना महत्त्व प्राप्त होते, त्यावेळी धर्मव्यवस्थेचे रक्षण करणाऱ्या राजाने धर्म तत्त्वांची चिकित्सा करणे अगत्याचे असते. या कर्तव्य भावनेने सयाजीराव तत्त्कालिन विचारवंतांशी, अभ्यासकांशी गाठीभेटी घेऊन चर्चा करत असत. त्यात होते कडकडीत प्रबोधनकार राजारामशास्त्री भागवत, आर्य समाजाचे नित्यानंद स्वामी, ख्रिस्त अभ्यासक जनरवूथ, संस्कृत पंडित हंसस्वरूप, वेदशास्त्रसंपन्न काशीनाथ लेले किंवा वामनशास्त्री इस्लामपूरकर, विदूषी ॲनी बेझंट, शेतकऱ्यांचे कैवारी जोतीराव फुले, सुधारक न्यायमूर्ती महादेव गो. रानडे, बहुजनाच्या शिक्षणासाठी काम करणारे ॲडव्होकेट गंगाराम भाऊ म्हस्के, बौद्ध धर्माचे अभ्यास डॉ. आनंद नायर, सत्यशोधक समाजाचे रामचंद्र धामणसकर आणि त्यांच्या पदरी नोकरीवर असलेल्या योगी अरविंद घोष, बॅ. केशवराव व खासेराव जाधव - या पंडितांशी त्यांचा वारंवार संवाद होई. यातून त्यांचा धर्मसंस्थेबद्दल जबाबदारीने आदर वाढत जाऊन त्यांनी हिमतीने बडोद्यात वरील धर्मसुधारणा केल्या.

## कला-संस्कृतीचा वारसा राष्ट्राची संपत्ती :

महाराजांनी हिंदवी संस्कृतीबद्दल अत्यंत अभिमान होता. इतिहास आणि तत्त्वज्ञान हे त्यांचे आवडीचे विषय असल्याने या अभ्यासातून त्यांनी जगभरातील संस्कृतीचा अभ्यास केला. पुढे आयुष्यभरात २७ वेळा केलेल्या जगप्रवासातून त्यांनी

बलवान राष्ट्राची बलस्थाने कोणती आहेत याचा जेव्हा शोध घेतला तेव्हा त्यांच्या लक्षात आले शिक्षणासोबत साहित्य, कला, संस्कृतीचा वारसा हेच राष्ट्राच्या समृद्धीचे एक माप आहे. त्यामुळे कोणत्याही राष्ट्राची समृद्धी ही जशी शिक्षण-उद्योगांच्या प्रगतीवर समजली जाते, तेवढीच त्या राष्ट्राच्या साहित्य, कला, संगीत आणि शिल्पकलांच्या वारशावरूनही मोजली जाते. यावर मूळ उपाय म्हणून सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षणाची पाणपोई सुरू केली. मुलगा-मुलगी शाळेत आली नाही तर पालकास दिवसात दोन आणे दंड सुरू केला. हिंदुस्थानातील ज्ञानाचा हा पहिला प्रयोग होता. हे ओळखलेल्या तरुण सयाजीरावांनी शिक्षण हाच प्रशासन, न्याय, शेती-उद्योग आणि साहित्य-कला या सांस्कृतिक वारशाचा मोठा आधार आहे. या कामांची पायाभरणी करण्यासाठी त्यांनी प्रत्येक गावात शाळा सुरू केल्या. जनतेतील साक्षरता टिकून राहावी म्हणून गावोगाव वाचनालये सुरू केली. वाचनालयासाठी पुस्तके हवीत म्हणून वेगवेगळ्या लेखकांना ग्रंथलेखनास मदत करून ग्रंथव्यवहाराचे ते पोशिंदे झाले. माणसांची गायन, संगीत, नाटक, चित्रकला या कला गुणांची आवड असते. यातून इ.स. १८९० साली बडोद्यात कलाभवनाची सुरुवात केली. या सांस्कृतिक सुधारणा केंद्रातून हिंदुस्थानातील साहित्य, संगीत, शिल्पकला, चित्रपट, नाट्य, तंत्रज्ञ, शिल्पकार तयार झाले. एवढेच नाही तर या देशाचा

सांस्कृतिक वारसा समृद्ध करणारा देशातील व देशाबाहेरील प्रज्ञावंतांना सन्मानाने बडोद्यात बोलावून या ज्ञानांचा उपयोग त्यांनी करून घेतला.

प्राचीन साहित्य हा आमचा सांस्कृतिक ठेवा आहे. त्याचे जतन, रक्षण आणि संवर्धन करण्यासाठी प्राच्यविद्या मंदिराची सुरुवात इ.स. १८९३ साली पाटण येथे सुरुवात केली होती. हे काम आणखी नेटाने व्हावे म्हणून बडोदा शहरात गायकवाड प्राच्याविद्या मंदिर सुरू केले. या संस्थेच्या माध्यमातून जुन्या संस्कृत, पाली, मराठी, गुजराथी, हिंदी ग्रंथाचे संशोधन-प्रकाशनाचे काम हा हिंदुस्थानातील सांस्कृतिक वारसा जतन करण्याचा महाराजांचा फार मोठा प्रयत्न होता. यातून श्रीसयाजीमाला, श्रीसयाजी ज्ञानमाला तसेच शिक्षण विभागातर्फे अनेक ग्रंथ प्रकाशित केले. इ.स. १९१० साली उभे राहिलेली सेंट्रल लायब्ररी ही तर त्याकाळात आशिया खंडातील एक मोठे ग्रंथालये होते. चित्र, शिल्प ही संस्कृती ही संस्कृती संवर्धनाचे एक अंग आहे. त्यांचे संग्रहालय उभे करून जनतेला हा अनमोल वारसा उपलब्ध करून दिला.

## सरस्वती आणि लक्ष्मीची कृपा असलेले प्रज्ञावंत :

महाराजा सयाजीराव हे हिंदुस्थानातील एक अनमोल अद्भुत उदाहरण आहे. सर्वसाधारणपणे सरस्वती अन् लक्ष्मी एका ठिकाणी गुण्यागोविंदाने नांदत असल्याचे फारसे दिसत नाही. सयाजीराव शेतकऱ्याचा एक मुलगा म्हणून जन्मले, पुढे बडोद्याचे

राजे बनले. जन्मगावी कवळाणे येथे लक्ष्मीसोबत सरस्वतीची कृपा नव्हती. राजा बनल्याने सुदैवाने लक्ष्मी लाभली; पण या सरस्वतीची कृपा त्यांनी मेहनत कष्टाने साधली. त्यावेळी या तरुण राजाने ओळखले, कोणतीही प्रगती ही नशीब अथवा दैवयोगावर कधीच अवलंबून नसते. ती कर्त्याच्या पुरुषार्थावर असते. याकरिता राजाने जनसेवेत आणि जनकल्याणातच आपला मोक्ष शोधावा. हेच काम सयाजीराव महाराजांनी आयुष्यभर रयतेच्या कल्याणाचा ध्यास घेतला.

जागतिक विचारवंत म्हणतात, आदर्श व सुप्रशासनाची राज्यपद्धती निर्माण करण्यासाठी प्रज्ञावंत प्रशासकाच्या हाती राजसूत्रे असली पाहिजेत. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाराजा सयाजीराव होते. महाराजांचा कामाचा उरक विलक्षण होता. प्रशासनातील समज द्रष्टेपणाची असल्याने एकाच वेळी वेगवेगळ्या क्षेत्रांत त्यांनी केलेली कामे व निर्णय ही सुप्रशासनाची उदाहरणे सांगता येतील. उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य, गरीब-श्रीमंत, काळा-गोरा असा भेदाभेद त्यांच्यात नव्हता. दुसऱ्यांच्या ज्ञानाबद्दल आदर, अनेक विषयांबद्दलीची रसिकता, स्वतःची तीव्र, ज्ञानलालसा, विचारांची सचोटी, बारीक गोष्टीतही चिकित्सेची आवड, दांडगी स्मरणशक्ती, नवे जोडावे पण जुने सोडू नये हा बाणा, उज्ज्वल देशभक्ती, सामान्य कर्तव्यनिष्ठा, प्रबोधनशक्ती आणि जगावेगळे दातृत्व या त्यांच्या गुणामुळेच स्वातंत्र्यपूर्व काळातील पंचाहत्तर वर्षांचा इतिहास हा महाराजा सयाजीरावांच्या सर्वक्षेत्रातील झगमगता कालखंड आहे.

धर्म आणि धर्म संस्थेबद्दल आदर असलेल्या सयाजीरावांनी धर्माने गरिबांचा कैवारी बनावे आणि परमेश्वर हा प्रत्येक माणसात असल्याने गरीब-वंचिताची सेवा यातच राजाचा मोक्ष असतो, हे सांगून आचरणात आणणारे हे एक प्रज्ञावंत सुप्रशासक होते. त्यांनी एका भाषणात सांगितले, ‘जर आपले साधुसंत, स्वामी, महाराज आणि ब्रह्मचारी स्वत:चे द्रव्य आणि शक्ती समाजातील चांगल्या कामासाठी खर्च करतील, तर देश प्रगतीचे पुष्कळचे कार्य होईल. आज हे लोक जनतेचा पैशा उधळत आहेत.’’ यावर राजप्रमुखाने जनकल्याणासाठी जबाबदारी पाऊले उचलली पाहिजेत, ते सयाजीराव वारंवार सांगत. याची गंभीपणे विचार करण्याची आजची गरज आहे. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक सुसंवाद या सुप्रशासनाच्या धोरणांचा हा अल्प आढावा पूर्ण करताना मी एका वाक्यात समारोप करत आहे. ते वाक्य आहे, महाराजा सयाजीराव हे आधुनिक भारताचे एक शिल्पकार आहेत, हे आपण समजून घेतले पाहिजे. आजच्या वर्तमानावर प्रज्ञावंत सयाजीरावांची ओळख समाज सुसंवाद आणि स्वास्थ्यासाठीचे एक उत्तर आहे.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूस्कर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Speчess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४